भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०२/२०१८

**१) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक २३/०२/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. ०१ नी फिर्यादी ला तु माझ्या पऱ्यावर तननाशक औषध का मारलास? असे बोलुन संगनमत करून सार्वजनीक ठिकाणी अपमान होईल अशा उद्येशाने अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व हातात काठी घेवुन फिर्यादीचे घरात प्रवेश करून आरोपी क्र. ०२ ते ०४ हे फिर्यादीचे घरासमोर उभे राहुन व आरोपी क्र.०१ ने जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४, ३२३,४५२,५०६,३४ भादवी. सहकलम ३(१)(आर)(एस) अजाज अप्रका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी तुमसर श्री. साळी पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक २३/०२/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व फिर्यीची पत्नी यांनी आरोपी क्र. ०१ ला 'तु आमची खार का जाळलीस' असे हटकले असता, आरोपी क्र. २ ते ४ यांनी तोंडा –तोंडी भांडण करून फिर्यादी व फिर्यादीचे पतीस थापड– बुक्यांनी मारपीट केली व आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीचे पतीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४, ३२३,४५२ ,५०६, ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) मोटार पंपाची चोरी . :—**

दिंनाक २२/०२/२०१८ चे दि.२३/०२/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा मौजा देव्हाडा बुज येथील शेतशिवारातील गव्हाचे पिकाला पाणी देण्याकरीता गेला असता, कोणीतरी अज्ञात इसमाने शेतातील मोटार पंपाचा स्वीच बोर्ड कि. २००/ रु. २) ३ नग किमती २००/रु. ३) १ स्टार्टर किमती १७,००/रु. ४) १ नग आटो स्वीच किमती ३९०/रु. असा एकुन २५,००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी व्यंकट नथ्थु सोनवाने वय ६४ रा. नरसीह टोला मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी. :—**

दिंनाक २१/०२/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देवचंद देवाजी घोरमारे वय ५० वर्ष रा. शिक्षक कॉलोनी गणेशपुर याने त्याची मोटार सायकल ही किमती १२,०००/रु. ही आनंद रेस्टारेन्ट गांधी चौक भंडारा समोर लॉक करून नाष्टा करीता आंनद रेस्टारेन्ट गांधी चौक भंडारा येथे गेला व परत आलेल्या जागेवर मोटार सायकल दिसुन आली नाही, आजुबाजुस शोध घेतला मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

**अ)** दिनांक २३/०२/२०१८ चे ११.४५ ते १२.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी– पिवळी वाहन ही जुना बसस्टॉप तुमसर येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. पुडके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. पुडके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २३/०२/२०१८ चे १७.३० ते १८.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन हा जुना बसस्टॉप तुमसर येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. धावडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**क)** दिनांक २३/०२/२०१८ चे १७.५० ते १८.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन हा जुना बसस्टॉप तुमसर येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. धावडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २३/०२/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स गाडी ही दवाखाना चौक गोबरवाही येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. इंगोले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २३/०२/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पीवळी वाहन ही साखरा फाटा येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. मडावी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. मडावी पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

७) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २३/०२/२०१८ चे १८.०५ वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही दारु पिवुन दारूचे नशेत कारधा एनएच ०६ रोड येथे चालवितांनी मिळुन आल्याने, याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालॉयझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता दारुचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बडवाईक वा.नि.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. राठोड पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

८) अवैध दारु / जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २३/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर आंधळगाव, पवनी व लाखनी येथे अवैध दारू / जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर हातभंट्टी दारू कमती ३,६००/रु. व १५ लिटर ४८० मिलीलीटर देशी दारू. कि. ४,९९२/रु. तसेच जुगारातुन ६३,८२००/रु असा एकुन किमती ६,४६,७९२/रु.माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २२/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती — ९५ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.